# :: प्रेस नोट ::

## आरोपी महादेव तानाजी बेलाखोडे, वर्ग —३, कनिष्ठ लिपीक कार्यालय शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प. चंद्रपूर यांना कारावासाची शिक्षा

तक्रारदार यांचे ननिकेत गुरूकुल इंग्लिश मिडीयम प्राथमिक शाळा बालाजी वार्ड बल्लरशाहा या कायम विना अनुदानीत प्राथमिक शाळेला खाते मान्यता प्रमाणपत्र तयार करून शिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी घवुन देणेकामी आरोपी महादेव तानाजी बेलाखोडे, वर्ग —३, कनिष्ठ लिपीक कार्यालय शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प. चंद्रपूर यांनी तक्रारदार यांना १२०००/—रू लाचेची मागणी करून स्विकारल्याने त्यांचे विरूध्द दि. २१/१०/२००८ रोजी पोस्टे रामनगर अ. क्र. ३३१९/०८ कलम ७, १३, (१) (ड), सह कलम १३ (२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले.

मा. श्री. दिपक भेंडे, मा. जिल्हा सत्र न्यायाधिश —१, तथा विशेष न्यायधिश चंद्रपूर यांचे न्यायालयात सदर खटला चालविण्यात आला. दि. १५/७/२०१९ रोजी मा. न्यायालयाने आरोपी महादेव तानाजी बेलाखोडे, वर्ग —३, कनिष्ठ लिपीक कार्यालय शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प. चंद्रपूर यांना १३ (२) लाप्रका मध्ये १ वर्षे सश्रम कारावास व २०००/— रुपये दंड दंड न भरल्यास २ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व ७ लाप्रका. मध्ये ६ महिने सश्रम कारावास व १०००/— रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

श्री श्रीकांत धिवरे पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नागपूर परिक्षेत्र तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा यांचे वतीने कोणी खाजगी ईसम लाचेची मागणी करीत असल्यास कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयाशी संपर्क साधावा.

SP ACB Nagpur-
Landline no. - 0712/ 2561520
Toll Free No. 1064
Website:- www.acbmaharashtra.gov.in
Mobile App:- www.acbmaharashtra.net
Facebook Page:- www.facebook.com/MaharashtraACB
Whatapp No- 9930997700

D.C.P./S.P. Anti Corruption Bureau ★Nagpur★

(विजय माहुलकर)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर